महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.१०/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४६१ दिनांक ०६ / ०७ / २०१३

विषय : कंपनीमधील पुरूष व महिला विद्युत सहाय्यकांना द्यावयाच्या गणवेषाबाबत.

वाचा : प्रशासकीय परिपत्रक क्र.३५० दि.३१.०५.२०००.

.....

म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित मधील कार्यरत तारमार्ग कर्मचाऱ्यांना संहिताबद्ध आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ मधील तरतुदींनुसार खाकी रंगाचे टेरिकॉट कापड गणवेषाकरिता दर दोन वर्षांनी एकदा पुरविण्यात येते. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.३५० दि.३१.०५.२००० अन्वये सदर वेतनगट ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांच्या गणवेषाच्या पॅटर्नबाबत व खरेदीबाबत सविस्तर सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

२. कंपनीने कनिष्ठ तंत्रज्ञ पदे भरण्याची पद्धत सुधारित करून ३ वर्षे कालावधीकरिता कंत्राटी पद्धतीने विद्युत सहाय्यकांची पदे भरण्याची तरतूद केलेली आहे. या अनुषंगाने कंपनीमध्ये नव्याने रूजू होणाऱ्या विद्युत सहाय्यकांना कंपनीचा गणवेष पुरविण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचारविनिमय करून कंपनीत विद्युत सहाय्यक पदी रूजू होणाऱ्या उमेदवारांना गणवेष पुरविण्याबाबत मंजुरी प्रदान केली आहे. यानुसार विद्युत सहाय्यकांना खालीलप्रमाणे गणवेष पुरविण्यात यावा.

क) विद्युत सहाय्यकांच्या गणवेषाच्या कापडाचा रंग खाकी असावा.

ख) विद्युत सहाय्यक पदी रुजू होणाऱ्या पुरूष कर्मचाऱ्यांकरिता प्रशासकीय परिपत्रक क्र.३५० दि.३१.०५.२००० अनुसार विहित करण्यात आलेल्या पॅटर्नकरिता कापड पुरविण्यात यावे.

ग) विद्युत सहाय्यक पदी रुजू होणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांकरिता हाफ शर्ट व पॅन्ट असा पॅटर्न विहित करण्यात आलेला असून पॅन्टचा पॅटर्न प्रशासकीय परिपत्रक क्र.३५० दि.३१.०५.२००० अन्वये असावा. तसेच हाफ शर्ट सोबतच्या परिशिष्ट 'क' मध्ये दर्शविलेल्या पॅटर्नप्रमाणे शिवण्यात यावा.

घ) महिला विद्युत सहाय्यकांच्या शर्टच्या डाव्या बाजूच्या खिशाच्या वरील बाजुस संबंधीत कर्मचाऱ्याची नामपट्टी लावण्यासाठी जागा असावी व एक खिसा उजव्या बाजूस असावा. तसेच शर्टच्या खाली दोन्ही बाजुस खिसा असावा.

च) महिला विद्युत सहाय्यकांकरिता तपकिरी रंगाचा अधातूक (Non Metalic) कमरपट्टा (Belt) विहित करण्यात आला असून संपूर्ण गणवेष सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'ख' मध्ये दर्शविलेल्या चित्राप्रमाणे परिधान करणे बंधनकारक आहे.

क्रा.प.

छ) महिला विद्युत सहाय्यकांना मोकळया केसरचनेचा कामात अडथळा येऊ नये या दृष्टीकोनातून डोक्यावर नेट परिधान करणे आवश्यक आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून हेल्मेट वापरणे अत्यावश्यक आहे.

ज) सर्व विद्युत सहाय्यकांना रबरी तळवा (सोल) असलेले काळे जोडे (शुज) परिधान करणे बंधनकारक आहे.

३. महिला कर्मचाऱ्यांना परिधान करावयाचा कमरपट्टा व डोक्यावर परिधान करावयाची नेट पुरविण्याबाबतची कार्यवाही मुख्य अभियंता (प्र.व सु.), म.रा.वि.वि.कं.मर्या., एकलहरे, नाशिक यांनी करावी. तसेच गणवेषासाठी पात्र विद्युत सहाय्यकांना प्रचलित तरतुदींनुसार गणवेषाच्या शिलाईबाबत, बुटांच्या खरेदीबाबत विहित करण्यात आलेल्या दरांनुसार संबंधीत कार्यालयामार्फत प्रतिपुर्ती देण्यात यावी.

४. सर्व विद्युत सहाय्यकांना कंपनीने विहित केलेला गणवेष बंधनकारक असल्याने क्षेत्रिय कार्यालयातील सर्व संबंधित मुख्य अभियंता यांनी विद्युत सहाय्यकांच्या गणवेषाबाबत उपरोक्तपणे विहित करण्यात आलेल्या सूचनांचे अवलोकन करून नव्याने रूजू झालेले विद्युत सहाय्यक कंपनीने विहित केलेला गणवेष परिधान करून प्रशिक्षणाकरिता हजर होतील याबाबत दक्षता घ्यावी.

५. सर्व विद्युत सहाय्यकांना गणवेषासाठी पुरविण्यात येणाऱ्या खाकी कापडाबाबत त्याच्या दराकरिता मुख्य अभियंता (सामुग्री व्यवस्थापन कक्ष) निगम कार्यालय, मुंबई यांच्याशी संपर्क करून त्या अनुषंगाने गणवेषाचे कापड विहित मुदतीत संबंधीतांना पुरविण्यात येईल याबाबतची काळजी घ्यावी.

६. सर्व मुख्य अभियंता यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्तपणे गणवेशाचे कापड खरेदी करण्याकरीता आणि विद्युत सहाय्यकांना गणवेष शिलाई व बुट खरेदीची प्रतीपुर्ती करण्याकरीता आवश्यक असलेल्या निधीसाठी व्यवस्थापक (विवले-अर्थोपाय विभाग) हाँगकाँग बँक बिल्डींग, ४ था मजला, मुंबई-४००००१. यांचेकडे संपर्क साधावा.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Adm.Cir.F.N.10 & 58-Uniform,Name Budget.doc*

परिशिष्ट-'क'



परिशिष्ट - 'ख'





A Netted Cap with elastic Covering Forehead upto the nape To be worn under helmet to Secure loose Hair. This imparts additional Electrical Security.